# MAHARASHTRA FILM, STAGE & CULTURAL DEVELOPMENT CORPORATION LIMITED

(A Government of Maharashtra Undertaking)

## Dadasaheb Phalke Chitranagari

Filmcity, Mumbai

https://filmcitymumbai.org


**वेस्टर्न ऑस्ट्रेलियन विधानसभेच्या अध्यक्ष मिशेल रॉबर्ट्स यांनी दादासाहेब फाळके चित्रनगरीला भेट दिली**

**------------------------------------**

**व्यवस्थापकीय संचालक डॉ. अविनाश ढाकणे यांनी स्वागत केले**

**------------------------------------**

दाफचि 4 : वेस्टर्न ऑस्ट्रेलियन विधानसभेच्या अध्यक्ष मिशेल रॉबर्ट्स आणि त्यांच्या शिष्टमंडळाने आज महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या अंतर्गत कार्यरत असलेली दादासाहेब फाळके चित्रनगरीला भेट दिली. महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे यांनी सर्वांचे प्रेमपूर्वक स्वागत केले.

या शिष्टमंडळात वेस्टर्न ऑस्ट्रेलियन विधानसभेचे सर्वश्री आमदार डॉ.डेव्हिड हनी, डॉ.जगदीश कृष्णन, कॅस्सिये रॉवे, वेस्टर्न ऑस्ट्रेलियन विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.अमित चकमा, कोवान विद्यापीठाच्या अधिष्ठाता मार्को रेमेस, मुर्डोच विद्यापीठाचे विभागीय व्यवस्थापक अर्जुन सिंघ, कार्यकारी संचालक ब्राड जॉली, कार्यकारी संचालक-शालेय शिक्षण ज्युनिता हेली, सहायक संचालक रोशन परेरा, प्र-कुलगुरू डेव्हिड हॅरीसन, कर्टिन विद्यापीठाचे प्रा.अभिजित मुखर्जी आदि मान्यवरांचा सहभाग होता.

यावेळी डॉ.ढाकणे यांनी शिष्टमंडळास महामंडळाच्या संपूर्ण कामाचे स्वरूप, चित्रनगरीत होणाऱ्या चित्रीकरणाचे व्यवस्थापन, महामंडळ अंमलबजावणी करत असलेले महाराष्ट्र चित्रपट एकल खिडकी योजना आणि भारतीय सिने क्षेत्राविषयी सादरीकरणाद्वारे माहिती सांगितली. तसेच सिने-टिव्ही असोसिएशनच्या पदाधिकाऱ्या सोबतही शिष्टमंडळाने चर्चा केली. दरम्यान चित्रनगरीत असलेल्या विस्लिंग वूड आंतरराष्ट्रीय फिल्म स्कूल आणि दादासाहेब फाळके प्राईम फोकस स्टुडीओला शिष्टमंडळाने भेट देऊन चित्रीकरणाच्या विविध स्तरांची माहिती जाणून घेतली.

यावेळी महामंडळाचे वित्तीय सल्लागार मुख्य लेखाधिकारी राजीव राठोड. उप अभियंता ( स्थापत्य ) संतोष मुरुडकर, मुख्य सुरक्षा अधिकारी सुनील घोसाळकर, खरेदी अधिकारी मंगेश राऊळ, संदीप कापुरे आदि अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.